**<u>ठळक बातम्या</u>**

- सुरक्षित, शांततापूर्ण आणि शाश्वत अंतराळक्षेत्राचा भारत पुरस्कर्ता असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग नवी दिल्लीत होणाऱ्या ब्रिक्स परिषदेत सहभागी होणार

- ई- कॉमर्स कंपन्यांना सवलती जाहीर केल्यावर महिनाभरातली किमान किंमतही जाहीर करावी लागणार

- MPSC गट ब आणि गट क मुख्य आणि पूर्व परीक्षा 2025 च्या चौकशीसाठी SIT स्थापन करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- चीनमध्ये बंदरावर मालवाहू जहाजाला लागलेल्या आगीत २५ जणांचा मृत्यू

**आणि**

- कनिष्ठ गट आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतीय मुलींचा पाकिस्तानवर १९-० नं विजय

**<><><><><>**

भारत हा, आंतरराष्ट्रीय कायदा, संवाद आणि बहुपक्षीय सहकार्याच्या पायावर उभ्या असलेल्या सुरक्षित, शांततापूर्ण आणि शाश्वत अंतराळक्षेत्राचा पुरस्कर्ता आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. वैज्ञानिक माहितीचा वापर खुल्या पद्धतीनं आणि सचोटीनं मानवतेच्या कल्याणासाठी व्हावा, असं मतही त्यांनी व्यक्त केलं. पॅरिस इथं सुरू झालेल्या आंतरराष्ट्रीय अंतराळ परिषदेला ते दूरस्थ पद्धतीनं संबोधित करत होते. अंतराळ क्षेत्रातल्या भागधारकांची संख्या वाढत असताना लगेच मिळणाऱ्या लाभांपेक्षा दीर्घकालीन शाश्वततेवर आणि सर्वसमावेशकतेवर भर द्यायचं आवाहन त्यांनी केलं. वसुधैव कुटुंबकम हे भारताचं तत्त्व, देशाच्या अंतराळ प्रवासातही दिसतं, असं सांगून चांद्रयान-३, आदित्य एल-१, ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांचा आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरचा प्रवास आणि आगामी मोहिमांचा गौरवपूर्ण उल्लेख मोदी यांनी केला.

या परिषदेच्या पार्श्वभूमीवर, अंतराळ क्षेत्रात भारत आणि फ्रान्स यांच्यातलं सहकार्य वाढवण्याच्या दृष्टीनं आज ३ नवे करार करण्यात आले. उपग्रहांचं प्रक्षेपण, अंतराळ निगराणी आणि मायक्रोसॅटलाइट तंत्रज्ञान या क्षेत्रातले हे करार आहेत.

**<><><><><>**

भारत-युरोप संबंधांमध्ये जर्मनीची भूमिका अतिशय महत्त्वाची असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्याशी फोनवर झालेल्या संवादादरम्यान केलं. जागतिक शांतता, स्थैर्य आणि समृद्धी प्रस्थापित करण्यात जर्मनी महत्त्वाचा भागीदार आहे, असंही ते म्हणाले. भारत आणि जर्मनीच्या नागरिकांच्या हिताच्या दृष्टीनं हे दोन्ही देश धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत करत राहतील, असंही मोदी म्हणाले.

**<><><><><>**

नवी दिल्लीत येत्या १२ आणि १३ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग भारताचा दौरा करणार आहेत. जवळजवळ ७ वर्षानंतरची त्यांची ही भारत भेट असेल. ब्रिक्स परिषदेच्या पार्श्वभूमीवर ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतील अशी अपेक्षा असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि आगाखान विकास नेटवर्क या स्वयंसेवी संस्थेचे प्रिन्स रहिम आगा खान यांची आज राष्ट्रपती भवन इथं भेट झाली. स्वयंसेवी संस्था सरकारसोबत भागीदारीत काम करुन लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी कशा प्रकारे मदत करतात याचा आढावा त्यांनी घेतला.

उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांचीही त्यांनी भेट घेतली. पाणीपुरवठा, मलनिःसारण, महिलांचे स्वयंसेवा गट, शिक्षण आणि समाजसेवा या क्षेत्रात आगाखान विकास नेटवर्कने केलेल्या कामाबद्द्ल त्यांनी चर्चा केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबतच्या बैठकीत आरोग्यसेवा, कृषी, ग्रामीण विकास, युवा आणि महिला सक्षमीकरण या बाबत त्यांची चर्चा झाली.

**<><><><><>**

ई कॉमर्स संकेतस्थळांवर किमतींच्या पारदर्शकतेबाबतचे नियम अधिक कठोर करण्यासाठी सरकारनं ग्राहक संरक्षण ई कॉमर्स नियम २०२० मधे, सुधारणा केली आहे. त्यानुसार, ई कॉमर्स संकेतस्थळांना आता सवलतीच्या किंमतींबाबत पारदर्शकता राखणं अनिवार्य असेल. संकेतस्थळांना विविध प्रकारच्या सवलतींची घोषणा केल्यानंतर, ती जाहीर करण्यापूर्वीच्या ३० दिवसांच्या कालावधीत उत्पादनाची सर्वात कमी किंमत देखील जाहीर करावी लागेल. 'मार्केटप्लेस' प्रकारच्या ई-कॉमर्स कंपन्यांना उत्पादनाचा सर्वोत्तम वापर कालावधी किंवा वापरण्याची अंतिम तारीख यांसारखी महत्त्वाची माहिती, तसंच वस्तू किंवा खरेदीची रक्कम परत करणं, वॉरंटी, वितरण आणि प्रत्यक्ष आर्थिक व्यवहार यांबाबतचा तपशील जाहीर करावा लागेल. एक जानेवारीपासून हे नियम लागू होणार आहेत.

**<><><><><>**

जगभरात राहणाऱ्या भारतीय आणि अनिवासी भारतीयांना सुलभ व्हावं यासाठी आधारची यंत्रणा जागतिक पातळीवर नेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे असं UIDAI चे मुख्य कार्यकारी अधिकारी सौरभ विजय म्हणाले. मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये ते आज बोलत होते.

नवनवीन सुधारणा करण्यासाठी नियम आणि कायदे सोपे करण्याची गरज असल्याचं निती आयोगाचे सदस्य राजीव गौबा आज म्हणाले. परवान्यांची मंजुरी, परवानगी, वारंवार करावं लागणारं नुतनीकरण थांबवण्याची गरज आहे. केंद्र सरकारनं स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीच्या माध्यमातून यावर काम सुरू आहे, असं ते म्हणाले.

नवनवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून निर्माण होत असलेले धोके कमी करण्यासाठी वित्तीय तंत्रज्ञान उद्योगानं अधिक गुंतवणूक करण्याची गरज Financial Action Task Force चे उपाध्यक्ष विवेक अग्रवाल यांनी व्यक्त केली.

सध्या वित्तीय तंत्रज्ञान क्षेत्रात भारत जगात तिसऱ्या स्थानी आहे. जागतिक पातळीवर वित्तीय क्षेत्राचं भवितव्य ठरवण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, असं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले.

**<><><><><>**

पोर्तुगालनं भारताच्या ताब्यात दिलेला कुख्यात गुंड अबू सालेम याची सुटकेची याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळली. प्रत्यार्पणाच्या अटींनुसार आपण भारतात २५ वर्षं तुरुंगवासाची शिक्षा भोगली असून, आपली सुटका करावी, असं याचिकेत म्हटलं आहे.

त्यावर निर्णय देताना न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या पीठानं सालेम याची तात्काळ सुटकेची मागणी करणारी याचिका अकाली आणि गैरसमजावर आधारित असल्याचं नमूद करून, मुंबई उच्च न्यायालयाचा गेल्या एप्रिल महिन्यातला आदेश कायम ठेवला.

मुंबईत १९९३मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी दोषी ठरलेल्या सालेम याचं प्रदीर्घ कायदेशीर लढ्यानंतर ११ नोव्हेंबर २००५ रोजी पोर्तुगालहून भारताकडे प्रत्यार्पण झालं होतं. सालेम याला फाशीची शिक्षा दिली जाणार नाही, तसंच त्याचा तुरुंगवास २५ वर्षांपेक्षा जास्त नसेल असं प्रत्यार्पणाच्या अटीत नमूद केलं होतं.

**<><><><><>**

MPSC च्या गट ब आणि गट क मुख्य आणि पूर्व परीक्षा 2025 ची चौकशी करण्यासाठी SIT स्थापन करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज दिलं. MPSC च्या परीक्षार्थींसोबतच्या बैठकीत ते आज मुंबईत बोलत होते. आठवडाभरात हे निर्देश MPSC ला दिले जातील असं ते म्हणाले.

**- - - होल्ड - मुख्यमंत्री बाइट - -**

याशिवाय अभियांत्रिकी, कृषी तसंच अन्न सुरक्षा अधिकारी परीक्षांच्या उत्तर पत्रिकांची पुन्हा तपासणी करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. तोपर्यंत या परीक्षांच्या मुलाखती होणार नाही, असं ते म्हणाले. माहिती अधिकार कायद्याच्या अंतर्गत उत्तर पत्रिका उपलब्ध करुन देण्यासाठी MPSC ला निर्देश दिले जातील, असं ते म्हणाले. MPSC च्या यंत्रणेत त्रुटी आहेत आणि त्यादुरुस्त करण्याची संधी मिळाली आहे. या दोषांसाठी जबाबदार असलेल्या व्यक्तीवर कारवाई करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. ज्या अधिकाऱ्यांच्या विरोधात पुरावे असतील ते सादर करा, संबंधितांची चौकशी करू असं आश्वासन त्यांनी या विद्यार्थ्यांना दिलं.

MPSC देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी दूर करण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याचं आश्वासन सुद्धा त्यांनी दिलं.

**<><><><><>**

चीनमध्ये एका बंदरावर नांगरलेल्या मालवाहू जहाजावर लागलेल्या आगीत २५ जणांचा मृत्यू झाला आणि ५ जण जखणी आहेत. या जहाजावर एकूण ४२ खलाशी होते, आणि त्यापैकी १२ जणांना सुरक्षितपणे बाहेर काढल्याचं स्थानिक वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

<><><><><>

महिला हॉकीमधे, कनिष्ठ गट आशिया चषक स्पर्धेत भारतानं आज पाकिस्तानचा १९-० नं धुव्वा उडवत या स्पर्धेतला सर्वात मोठा विजय नोंदवला, आणि उपांत्य फेरीत प्रवेश केला. चीनमधे मोकी इथं झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात भारतीय संघातल्या मुलींनी आज सुरुवातीपासून आक्रमक खेळ केला. १८ पेनल्टी कॉर्नर्स आणि एक पेनल्टी स्ट्रोक मिळवत त्यांनी १९ गोल केले. पूजा मलिकनं तीन गोल करत हॅट ट्रिक साधली. या आक्रमक पवित्र्यापुढं पाकिस्तानला एकही गोल करण्याची संधी मिळाली नाही.

<><><><><>

महिलांच्या आशिया चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारताचा सामना बांगलादेशविरुद्ध होत आहे. बांगलादेशनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या २ षटकांमध्ये १ बाद ९ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//